प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

सप्टेंबर ७, २०१२

**आरबीआयक्यु - आरबीआय, आंतर-शालेय चाचणी-परीक्षा/कोडे सुरु करणार - आर्थिक साक्षरतेला प्रोत्साहन देण्यासाठी एक नवीन पुढाकार**

सप्टेंबर १०, २०१२ पासून भारतीय रिझर्व बँक (आरबीआय), अखिल भारतीय अशी आंतर-शालेय चाचणी परीक्षा/कोडे सुरु करणार आहे - शालेय स्तरावरील आर्थिक साक्षरतेला प्रोत्साहन देण्यासाठी एक नवीन पुढाकार ह्यालाच आरबीआय क्विझ किंवा रिझर्व बँक (आरबी) आयक्वोशंट म्हणता येईल. ही चाचणी, ९वी, १०वी, ११वी व १२वीच्या विद्यार्थ्यांमध्ये घेण्यात येईल. ही केवळ सुरुवातच असल्याने, ह्या वर्षी, देशभरातील सर्व बोर्डांमधील निवडक शाळांना ह्यात भाग घेण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे.

ही आरबीआयक्यु घेण्याची उद्दिष्टे म्हणजे –

- रिझर्व बँकेची, बँकिंग व वित्त त्याबाबतची भूमिका, इतर बँकिंग संस्था, अर्थव्यवस्था, चालु घडामोडी आणि इतकी वर्षे भारताच्या प्रगतीला हातभार लावणा-या व्यक्ती व घटना ह्यांचा इतिहास ह्याबाबत जाणीव निर्माण करणे

- देशभरातील विद्यार्थी व रिझर्व बँक ह्यांच्यामध्ये एक बंध निर्माण करणे आणि वित्तीय साक्षरतेचा मोठा प्रसार करणे आणि
- हुशार तरुण विद्यार्थ्यांना ओळखून एका राष्ट्रीय मंचावर त्यांना प्रोत्साहन देणे.

ह्या चाचणीमध्ये, रिझर्व बँक, भारतीय बँकिंगचा इतिहास, बँकिंग, अकाऊंटिंग, वित्त, व्यापार व वाणिज्य, भारतीय अर्थव्यवस्था, अर्थशास्त्र, सर्वसाधारण व्यापारातील अटी-शर्ती, गेल्या ७७ वर्षातील भारताने केलेली कामगिरी (रिझर्व बँकेच्या स्थापनेपासून) व त्याचबरोबर थोडे सामान्य ज्ञान व चालु घडामोडींचा समावेश असेल. ह्यात सहभागी होणारे व श्रोतेगण ह्यात रमून जावेत आणि त्यातील विषयांबाबत अधिक माहिती मिळविण्याची त्यांना इच्छा व्हावी ह्यासाठी, प्रश्नांचे स्वरुप मनोरंजक ठेवले जाईल. ही चाचणी, आपल्या देशातील आघाडीचे क्विझ मास्टर श्री. बॅरी ओब्रायन आणि त्यांचा नेहमीचा जोडीदार व सहयोगी श्री. रायान शॉ ह्यांच्याद्वारे घेतली जाईल व रिझर्व बँकेच्या ह्या क्विझबाबत सं-शोधन करण्यातही मदत करतील

३० पेक्षा अधिक शहरातील एलिमिनेशन फेरी संपल्यावर, नोव्हेंबर २०१२ च्या मध्यास क्षेत्रीय फे-या घेतल्या जातील आणि राष्ट्रीय अंतिम फेरी, डिसेंबर २०१२ च्या मध्यास मुंबईला ठेवली जाईल. विजेत्यांना, रिझर्व बँकेच्या गव्हर्नरांच्या हस्ते आकर्षक बक्षिसे दिली जातील. ह्यात भाग घेणा-या सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्रे दिली जातील.

**अल्पना किल्लावाला**

मुख्य महाव्यवस्थापक

**वृत्तपत्रांसाठी निवेदन २०१२ -२०१३/४०५**